**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन क्र.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स क्र. ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/२०१६/वाचन प्रेरणा /मवि-१ / ११३७८ दिनांक-०४/१०/२०१६

प्रति,

१) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

२) विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, सर्व विभाग.

**विषय :- भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा दि.१५ ऑक्टोंबर हा जन्मदिन, " वाचन प्रेरणा दिन " म्हणून साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :- मा.मंत्री महोदय यांचे पत्र दि.२८.०९.२०१६**

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने त्यांचा दि.१५ ऑक्टोंबर हा जन्मदिन " वाचन प्रेरणा दिन " म्हणून साजरा करण्यात येतो. विद्यार्थ्यांमध्ये व समाजाच्या इतर घटकांना वाचनाची आवड व प्रेरणा निर्माण व्हावी व वाचनाचे महत्त्व जाणून घेण्यासाठी दि.१५ ऑक्टोंबर हा " वाचन प्रेरणा दिन" म्हणून खालील उपक्रम घेवून साजरा करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. या दिवशी घ्यावयाच्या संभाव्य कार्यक्रमाबाबत ची यादी संदर्भिय पत्रासोबत देण्यात आलेली आहे. (प्रत संलग्न)

आपल्या अधिनस्त विद्यापीठे, शासकीय व अशासकीय महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यामध्ये पुस्तकांच्या वाचनाच्या अनुषंगाने व्याख्याने, चर्चासत्रे , वकृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा इ. कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. शाळा , महाविद्यालय , ग्रंथालय व इतर संस्थांनी आपल्या परिसरात " डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम वाचन कट्टा " निर्माण करावा. सार्वजनिक कार्यक्रमात पाहुण्यांना पुष्पगुच्छांऐवजी पुस्तक भेट देण्याच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

उपरोक्त संदर्भिय पत्रात दिलेल्या सूचनेनुसार आपल्या विद्यापीठांत " वाचन प्रेरणा दिन" साजरा करण्यात यावा. तसेच आपल्या अधिनस्त सर्व महाविद्यालयांना दि.१५ ऑक्टोंबर हा दिवस " वाचन

प्रेरणा दिन" साजरा करण्याच्या सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात. सदर " वाचन प्रेरणा दिन" साजरा करण्यासाठी आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यावर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल संचालनालयास तसेच मा.मंत्री महोदयांच्या vinodtawdeminister@gmail.com या ई-मेलवर सादर करण्यात यावा.

(डॉ. धनराज माने )
संचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

प्रत-

१) स्वीय सहायक, मा.मंत्री शालेय शिक्षण , उच्च व तंत्र शिक्षण , महाराष्ट्र राज्य. यांना माहितीस्तव.

२) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

३) उचित कार्यवाहीस्तव- प्राचार्य, सर्व महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य. ( ई-मेल द्वारे)

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,
उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक
कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : २८ सप्टेंबर, २०१६

सस्नेह नमस्कार!

भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना सार्थ आदरांजली अर्पण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने गेल्या वर्षीपासून (२०१५) डॉ. कलाम यांचा जन्मदिवस **(१५ ऑक्टोबर)** हा **'वाचन प्रेरणा दिन'** म्हणून साजरा करण्याचे घोषित केले. त्यानुसार गेल्या वर्षी पहिला वाचन प्रेरणा दिन संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने, अभूतपूर्व प्रतिसादासह आणि अत्यंत उत्तम पद्धतीने संपन्न झाला.

माळरानातील शाळेपासून ते शहरांतील वातानुकूलित खोल्यांत भरणाऱ्या शाळेपर्यंत आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थांपासून ते अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन महाविद्यालयांपर्यंत सर्वच स्तरांवर पहिला वाचन प्रेरणा दिन दिमाखात पार पडला. ग्रंथालये, साहित्यिक-सांस्कृतिक संस्था आणि खाजगी कार्यालये यांचाही सहभाग लक्षणीय होता. यामध्ये प्रसारमाध्यमांचीही भूमिका खूपच मोलाची ठरली.

वाचन प्रेरणा व संस्कृतीचा विकास ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. **याही वर्षी (२०१६) आपल्याला वाचन प्रेरणा दिन उत्साह आणि गांभीर्यासह साजरा करायचा आहे.** ज्ञानसंपन्न व माहितीसमृद्ध समाजाची घडण, व्यक्तिमत्त्व विकास, साहित्य विकास आणि भाषाविकास यांसाठी वाचन संस्कृतीचा विस्तार आणि विकास करणे अत्यावश्यक आहे. म्हणूनच वाचन प्रेरणा दिनासारखे उपक्रम योजणे गरजेचे आहे.

**सर्व माध्यमांच्या व सर्व मंडळांच्या (बोर्डांच्या) शाळा, सर्व प्रकारची महाविद्यालये, खाजगी-सार्वजनिक ग्रंथालये, साहित्यिक-सांस्कृतिक संस्था, प्रकाशक-लेखक-पुस्तक वितरक, वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या अशा सर्वच घटकांनी वाचन प्रेरणा दिनी कार्यक्रम-उपक्रम योजावेत, असे आवाहन मी शासनाच्या वतीने करीत आहे.** संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणूस आपल्याला भरघोस प्रतिसाद देईल, अशी मला खात्री आहे.



Scanned by CamScanner

मंत्री
महाराष्ट्र राज्य

**मंत्री**
**शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,**
**उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक**
**कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ**
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक :

सोबत उपक्रम सूची जोडली आहे, या सूचीतील वैविध्यपूर्ण कार्यक्रम होऊ शकतात. आपणही आपल्या कल्पनाशक्तीनुसार नावीन्यपूर्ण आणि अभिनव उपक्रम योजू शकता. **'उपस्थितांचा (विद्यार्थी / रसिक वाचकांचा) सहभाग' हे सूत्र कार्यक्रम योजताना आवर्जून लक्षात ठेवावे.**

वाचन प्रेरणा दिनाच्या उपक्रमात आपला सार्थ आणि सक्रिय सहभाग आपण नोंदवालच, या खात्रीसह आपणा सर्वांना माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**सहपत्र : तपशीलवार उपक्रम सूची**

आपला,

**(विनोद तावडे)**

---

**टीप :** आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल **vinodtawdeminister@gmail.com** या ई-पत्त्यावर किंवा पत्रात नमूद कार्यालयीन पत्त्यावर जरुर पाठवावा.

canned by CamScanner

(मा.मंत्री महोदयांच्या दि.२८ सप्टेंबर, २०१६ च्या पत्राचे सहपत्र)

# वाचन प्रेरणा दिन

## स्व. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन - दि. १५ ऑक्टोबर
## संभाव्य कार्यक्रम

---

१. व्याख्यान (वाचन प्रेरणा किंवा वाचन संस्कृतीशी संबंधित विषयावर).

२. चर्चासत्र / परिसंवाद / कार्यशाळा (वाचन प्रेरणा किंवा वाचन संस्कृतीशी संबंधित विषयावर).

३. लेखकांशी त्यांच्या लेखनाविषयी, त्यांच्या कलाकृतींविषयी चर्चा किंवा त्यांची प्रकट मुलाखत.

४. सुसंगत स्पर्धा (निबंध स्पर्धा किंवा काव्यवाचन स्पर्धा किंवा अभिवाचन स्पर्धा... इत्यादी).

५. विद्यार्थ्यांनी किंवा वाचकांनी आवडत्या पुस्तकाविषयी आणि लेखकाविषयी लेखी किंवा तोंडी मनोगत व्यक्त करणे.

६. वाचन कौशल्याचा विकास या विषयावरील प्रशिक्षण व सादरीकरण.

७. वृत्तपत्रांतील अग्रलेख / प्रमुख लेखांचे वाचन.

८. ई- बुक्सचे सामूहिक वाचन.

९. निवडक कथा, कविता आणि उतारे यांचे अभिवाचन.

१०. एखाद्या सुप्रसिद्ध पुस्तकातील महत्त्वाच्या / निवडक पानांचे सामूहिक वाचन (पारायण).

११. प्रकाशक / वितरक / ग्रंथालये यांच्या सहकार्याने पुस्तकांचे प्रदर्शन.

१२. **संकल्प** – महिन्यातील एक दिवस '**नो गॅजेट डे**' म्हणून कृतीत आणण्याचे आवाहन. (' नो गॅजेट डे'- मोबाईल, व्हॉटस्ॲप, फेसबुक, ट्विटर न वापरता तो वेळ वाचनासाठी देणे.)

१३. सलग काही वेळ (शांतपणे, एकट्याने) वाचनाचा उपक्रम (विद्यार्थी / वाचक एखाद्या वर्गात / सभागृहात बसून एकट्याने पुस्तक वाचतील.)

१४. वाढदिवशी एकमेकांना पुस्तक भेट देण्याचे आवाहन.

१५. वाचन प्रेरणा दिनाचे निमित्त साधून विद्यार्थ्यांनी / नागरिकांनी एकमेकांना पुस्तक भेट द्यावे.

१६. शाळा, महाविद्यालय, ग्रंथालय व इतर संस्थांनी आपल्या परिसरात **'डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम वाचन कट्टा'** निर्माण करावा.

१७. **पुष्पगुच्छ नाही पुस्तक** (बुके नाही बुक) - सार्वजनिक कार्यक्रमांत पाहुण्यांना पुष्पगुच्छांऐवजी पुस्तक भेट देण्याच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी व प्रसार.

१८. वाचन प्रेरणा दिनाच्या बोधचिन्हाचा (लोगोचा) सोशल मीडियाद्वारे आणि रंगीत छापील प्रती काढून प्रसार.

---

**टीप :** आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल **vinodtawdeminister@gmail.com** या ई-पत्त्यावर किंवा पत्रात नमूद कार्यालयीन पत्त्यावर जरुर पाठवावा.

canned by CamScanner